महाराष्ट्र शासन

क्र. न्यायाप्र-२५१७/प्र.क्र.१७४/आस्था-१०
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४००००१
दिनांक- १ ऑगस्ट,२०१७.

प्रति,
१)सर्व विभागीय आयुक्त,
२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषदा.

विषय- प्रशासकीय सेवेतील न्यायिक तत्वाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत.

संदर्भ- विधी व न्याय विभागाचे परिपत्रक क्रमांक-६८१/२०१६. एमआयएससी/ई, दिनांक २८ फेब्रुवारी,२०१७.

मा. प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मूळ अर्ज क्रमांक-५९,६१ आणि ९०/२०१६ मध्ये दिनांक १४.१२.२०१६ रोजीच्या आदेशामध्ये असे नमूद केले आहे की, अर्जदाराने तात्पुरती पदोन्नती स्विकारायला नकार दिल्याने त्याला कालबध्द पदोन्नती देण्याकरिता प्रशासनाने नकार दिला आहे. या बाबीबददल मा. प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. अशाच प्रकारच्या इतर मूळ अर्जामध्ये मा. प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेले आदेश हे अंतिम आहेत.

२. मा. प्रशासकीय न्यायाधिकरणाने उपरोक्त न्यायनिर्णयाच्या परिच्छेद-८ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे.

*" If a principle of general applicability is capable of being culled out from a particular pronouncement of this Tribunal, then similarly placed employees, though not before the Tribunal should be given the benefit thereof without actually moving*

this Tribunal for relief. If on the other hand, the relief is person specific
course, this direction will not apply.

३. मा. सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश शासन आणि इतर विरुध्द अरविंद
श्रीवास्तव-२०१५ (१)एस.सी.सी. ३४७ मध्ये उपरोक्त प्रमाणेच समान निदेश दिलेले
खालीलप्रमाणे आहेत.

*"Normal rule is that when a particular set of employees is given relief ... Court, all other identically situated persons need to be treated alike by ex... that benefit. Not doing so would amount to discrimination and would be vio... Article 14 of the Constitution of India. This principle needs to be applied in ... matters more emphatically as the service jurisprudence evolved by this C... time to time postulates that all similarly situated persons should be treated ... Therefore, the normal rule would be that merely because other similarly ... persons did not approach the Court earlier, they are not to be treated differ...*

४. मा. सर्वोच्च न्यायालयाने तसेच प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी
उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने प्रशासकीय प्रकरणात सर्व विभागांनी निर्णय घ...
स्वयंस्पष्ट निदेश मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी उपरोक्त नमूद दिनांक २...
च्या परिपत्रकांन्वये दिलेले आहेत.

५. या विभागात जिल्हा परिषदेतील अधिकारी/कर्मचारी यांची प्रशासकीय प्रक...
मा.कामगार न्यायालय, मा. औद्योगिक न्यायालय, मा. उच्च न्यायालय यांनी एखाद...
कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय दिलेला असल्यास त्याच संवर्गातील इतर अधिकारी/क...
संदरहू न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने लाभ देण्यात येत नसल्याचे दिसून ...
असे अधिकारी/कर्मचारी विविध न्यायालयात पूर्वाश्रमीच्या न्यायालयाच्या आदे...
देऊन प्रकरणे न्यायालयात दाखल करतात व अशा प्रकरणात पुन:श्च पूर्वीप्रमाणे...

आदेश पारित करते. अशा न्यायालयीन प्रकरणांमुळे जिल्हा परिषद, विभागीय आयुक्त कार्यालय तसेच शासन स्तरावरील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या बहुमूल्य वेळेचा कालापव्यय होतो.

६. मा. प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व भविष्यात असे प्रकार निदर्शनास आल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर सक्त शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल. तरी ही बाब न्यायालयीन प्रकरणे हाताळणाऱ्या आपल्या अधिपत्याखाली सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दयावी त्याचप्रमाणे सद्यस्थितीत विविध न्यायालयात अशा प्रकारची प्रकरणे दाखल झालेली असल्यास त्या प्रकरणांचा आढावा घेऊन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सत्वर कार्यवाही करुन त्यांचा कार्यपालन अहवाल शासनास पाठवावा, ही विनंती.

(भरत पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत-
१) सह सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) सर्व कक्ष अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) निवडनस्ती (आस्था-१०).